**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १ चा उलटतपास प्रतिवादी क्र. १ते४ विधीज्ञ श्री.वाय. बी. हासे यांचे मार्फत शपथेवर सुरु –</u>**

०१. माझे इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. सदरचा दावा माझे वडीलांनी दाखल केला होता. दावा मिळकतीचे अभिलेख पुराव्याचे शपथपत्र देण्यापुर्वी मी पाहिले आहे. दावा मिळकतींच्या चतु:सिमा, गट नंबर व क्षेत्रफळ मला सांगता येईल. गट नं. ७८/४ चे क्षेत्र ००.०२.५० आर. क्षेत्र हायवे पासून १०० फूट सोडून पश्चीमेस घेतले आहे. जुन्या हायवेपासून १०० फूट सोडून वरील क्षेत्र खरेदी केले असा मजकूर दाव्यामध्ये नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात जुन्या हायवेपासून १०० फूट सोडून वरील क्षेत्र खरेदी केले असे नमूद नाही. साक्षीदाराला आता वादपत्र दाखविले त्यामध्ये जुन्या हायवेपासून १०० फूट सोडून वरील क्षेत्र खरेदी केले असे नमूद नाही. गट नं. ७८/४ च्या पुर्वेस हायवे आहे, दक्षीणेला गट नं. ६९, पश्चीमेला गट नं. ७८ चे विक्री केलेले क्षेत्र व उत्तरेला गट नं. ७९ आहे.

०२. सदरचा दावा माझे वडीलांनी गट नं. ७८/४ शिवाय इतर मिळकतींसाठी केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यात गट नं. ७८/४ ही मिळकत सोडून इतर मिळकती नमूद केलेल्या नाही. त्या मिळकतींचे गट नंबर मला सांगता येणार नाही. त्या मिळकती गट नंबर ७८/१ मधील आहेत. त्याचे क्षेत्र तसेच चतु:सिमा सिमा मला सांगता येणार नाही. गट नंबर ७८ चे एकुण सात ७/१२ उतारे आहेत. त्याचे क्षेत्र व चतु:सिमा मी सांगू शकत नाही. ते ७/१२ उतारे मी स्वत: पाहिलेले नाही त्यामुळे ते कोणाच्या नावावर आहे हे देखील मी सांगू शकत नाही. प्रतिवादी क्र. २ हा जन्मत: अंध आहे. त्याच्या विरुध्द दावा दाखल करतांना न्यायालयाची परवाणगी घेतली किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ ने रे.मु.नं. १३२४/२०१६ हा माझे विरुद्ध दाखल केला आहे. त्या दाव्यात माझे वडील हजर झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या क्षेत्राबाबत दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर सदरचा दावा एक

वर्षाने दाखल करण्यात आला. माझे वडील थोडेफार चालतात फिरतात. त्यांना निट ऐकायला येत नाही. सदर दाव्यात माझे वडीलांना ऐकायला येत नसलेबाबत डॉक्टरांचे प्रमाणपत्र दिले आहे. माझे वडीलांनी मला सदर दाव्यात त्यांच्या वतीने पुरावा देणेबाबत कोणतेही लेखी अधिकारपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील स्वत:ची कामे स्वत: करतात.

०३. प्रतिवादी क्र. ३ चे प्रतिवादी विनायक सटवाजी आहेर हे कधी मयत झाले त्याची तारीख मी सांगू शकत नाही. त्यांच्या कुंटूंबात प्रतिवादी क्र. १ ते ४, रोहिणी सुदाम आहेर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, विनायक सटवाजी आहेर यांच्या कुंटूंबाचा कारभार प्रतिवादी क्र. ३ हे पाहतात. साक्षीदार स्वत: सांगतात की, त्यांच्या कुंटूंबाचा कारभार प्रतिवादी क्र. १ पाहतात. प्रतिवादी क्र. १ च्या वडीलांनी प्रतिवादी क्र. ५ते१२ यांना कोणत्या मिळकती खरेदीने दिल्या हे मला सांगता येणार नाही. सदरचा दावा दाखल करण्यापुर्वी माझे वडीलांनी प्रतिवादी क्र. १३ते१६ यांना नोटीसा पाठविल्या नाहीत.

०४. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८६ साली नाशिक पुणे रस्ता हा डांबरी रस्ता होता व तो १५ ते २० फुटी रस्ता होता. तो रस्ता इंग्रजांच्या काळापासूनचा जुना रस्ता आहे. आहे. नाशिक पुणे हायवे हा सन २०१५ नंतर झाला. तो रस्ता चार पदरी आहे. पुर्वी जुना रस्ता एक पदरी होता आता चार पदरी रस्ता झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांना दिलेले क्षेत्र जुन्या रस्त्यापासून १०० फूट सोडून दिलेले आहे. त्याप्रमाणे आमच्या नावाची नोंद रेकॉर्डला झाली आहे. मी अथवा माझे वडीलांनी खरेदीखताबाबत कोणतीही तक्रार कोठेही केलेली नाही.

०५. हायवेसाठी जमीन संपादन करण्याची कार्यवाही सन २०१२ सुरु झाली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे ०२ आर. क्षेत्र संपादीत झाल्याबाबत माझे वडीलांना नोटीस आली होती. त्या ०२ आर. क्षेत्राचे अवॉर्ड माझे वडीलांचे नावे झाले आहे व अवॉर्डची रक्कम माझे वडीलांचे नावे मंजूर झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, संपादनाची नोटीस मिळाल्यानंतर

त्याबाबत माझे वडीलांनी तक्रार केलेली नाही.

प्रतिवादी वकिलांचे तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृती,

दि. ०६/०४/२०२६

(श्रीमती डी.पी. कडुस्कर)
२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
संगमनेर, जि.अहमदनगर.